"जणहिताय सर्वदा"


महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४६०,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दूरध्वनी क्र. ०२२-२२८७१४९६ Email ID : desk१२.rn/@maharashtra.gov.in


क्रमांक : आस्था-२०२२/प्र.क्र.५३/फ-१२ दिनांक : ११ जानेवारी, २०२३

प्रति,
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

विषय:- वैद्यकिय खर्च प्रतिपूर्तीच्या देयकांबाबत.

संदर्भ:- १) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय दि.१९.०३.२००५
२) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय दि.०४.०४.२०१४
३) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय दि. ०६.०६.२०१९
४) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय दि.१९.०७.२०२२


02 FEB 2023
1786


महोदय,

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संदर्भ क्र.३ येथील शासन निर्णयातील तरतुदीनुसार आपल्या कार्यालयामार्फत शासन सेवेतील अधिसंख्य वनमजुरांची ३ लाखावरील वैद्यकीय खर्चाची देयके लेखाशिर्षाविना प्रतिपूर्तीसाठी शासनास प्राप्त होतात.

२. सदर वैद्यकीय देयकाच्या प्रतिपुर्तीच्या अनुषंगाने अभिप्राय देण्यासाठी संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांना विनंती करण्यात येते. विभागाच्या वैद्यकीय देयकाच्या प्रतिपुर्तीच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये उपसंचालक, आरोग्य सेवा रुग्णालये (राज्यस्तर), मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेली समिती सामान्यपणे खालीलप्रमाणे अभिप्राय देते.

| अ.क्र. | खर्चाची बाब | उपसंचालक आरोग्य सेवा यांचे अभिप्राय |
|---|---|---|
| १ | औषधोपचार खर्च | कमाल मर्यादा-एकूण औषधोपचार खर्चाच्या ९०% रक्कम अनुज्ञेय, तत्पूर्वी देयकामध्ये समाविष्ट असलेल्या सोबतच्या यादीतील नादेय बाबींची वजाती शा.नि. दि.१९.०७.२०२२ नुसार करण्यात यावी. |
| २ | रुग्णालयातील वास्तव्य खर्च | आय.सी.यू-अनुज्ञेय रुपये २,०००/- प्रति दिन.<br>इतर कक्ष- अनुज्ञेय रुपये १,०००/- प्रति दिन. |
| ३ | डॉक्टर व्हिजीट चार्जेस | रुपये ५००/- प्रति व्हिजीट अनुज्ञेय |
| ४ | Ventilator Charges | कमाल अनुज्ञेय रुपये ३,०००/- प्रति दिन |
| ५ | अनुज्ञेय नसलेला खर्च | Other Charges या बाबींची वजाती करण्यात यावी. |

३. आपणास विनंती आहे की, अधिसंख्य वनमजूरांची वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती देयके शासनाकडे मंजुरीस्तव पाठविताना उपरोक्त प्रमाणे वजाती करुन व संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयातील तरतुदीनुसार देयकाची परिगणना करुनच प्रस्ताव शासनास सादर करावेत. तसेच वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती देयके शासन मंजुरीस्तव सादर करतांना ज्या लेखाशीर्षाखाली सदर देयक खर्ची टाकावयाचे आहे, ते लेखाशीर्ष व उद्दीष्ट नमूद करुनच सदरची देयके शासनास सादर करावीत. उक्त बाबी आपल्या स्तरावरुन सर्व संबंधितांना कळविण्यात याव्यात.

आपला,
(सं. ज. काळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन


३८९४
03 FEB 2023


निवडनस्ती, (फ-१२)

C:\मेडिकल बिल\२०२२\C.R.५३-२०२२ श्रीमती शांता प्रकाश सि...docx